# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
## कोल्हापूर विभागीय मंडळ , राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४

Website www.sscboardkolhapur.in Chairman 2690829[O] Secretary 2691405 [O]
PBX -0231 2696101, 2696102,2696103 FAX : [0231] 2690758 E-Mail: divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/उमा.प्रात्य./तोंडी/श्रेणी/२७९६
दिनांक : १७/०२/२०२२

प्रति,
प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च /एप्रिल २०२२ च्या प्रात्यक्षिक / तोंडी /प्रकल्प परीक्षेसाठी विलंबाने आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ परीक्षेस खास बाब म्हणून शासनाकडून कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ठ होता येईल म्हणून लेखी परीक्षेच्या आदल्यादिवसापर्यंत परीक्षेचे आवेदनपत्र मंडळात जमा करून त्या विद्यार्थ्यास परीक्षा प्रविष्ठ होण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

दिनांक १०/०२/२०२२ रोजी प्रात्यक्षिक / तोंडी /श्रेणी परीक्षेचे साहित्य व O.M.R. गुणतक्ते सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना वितरीत करण्यात आले आहे. काही विद्यार्थ्यांनी उशिरा आवेदन भरल्यामुळे O.M.R. गुणतक्त्यामध्ये त्याचे बैठक क्रमांक उपलब्ध झालेले नाहीत. तरी अशा विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक / तोंडी / श्रेणी विषयाची परीक्षा घेऊन त्यांचे गुण / श्रेणी ही कनिष्ठ महाविद्यालयाच्या लेटर हेडवरती बैठक क्रमांक, विषय क्रमांक ,गुण / श्रेणी यांची नोंद करण्यात यावी व शेवटी विषय शिक्षक / अंतर्गत / बहिस्थ परीक्षक यांची स्वाक्षरी घ्यावी. तसेच कॉलेजचा शिक्का मारून त्यावरती प्राचार्याची स्वाक्षरी घेऊन सदर गुणतक्ता O.M.R. गुणतक्त्यांच्या पाकिटात समाविष्ठ करण्यात यावे.

सर्व साहित्य दिनांक ०७/०३/२०२२ रोजी वितरण केंद्रावर जमा करावे. आपल्या कनिष्ठ महाविद्यालातील आवेदन पत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रात्य / तोंडी / श्रेणी परीक्षा घेतली असल्याची खात्री करावी. कोणत्याही विद्यार्थ्यांची परिक्षा घेतली नाही / गुण देण्याचे राहून गेले अशी कोणतीही तक्रार करता येणार नाही. तरी वरील दिलेल्या सुचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर